# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः30.01.2026** **वारःशुक्रवार**

1. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना बारामती इथं अफाट जनसागराच्या उपस्थितीत शासकीय इतमामात अखेरचा निरोप
2. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांसाठी आता पाचऐवजी सात फेब्रुवारीला होणार मतदान; नऊ फेब्रुवारीला मतमोजणी
3. आर्थिक सर्वेक्षण संसदेत सादर, विद्यमान आर्थिक वर्षात देशाचा जीडीपी वाढीचा दर 7 पूर्णांक 4 दशांश टक्के राहण्याचा अंदाज आणि
4. प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर पार पडलेल्या संचलनामध्ये महाराष्ट्राच्या चित्ररथाला पहिला क्रमांक, तर राज्याची तनु भान ठरली सर्वोत्कृष्ट एनसीसी कॅडेट

**<u>अजित पवार-निधन</u>**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिव देहावर काल बारामती इथल्या विद्या प्रतिष्ठानच्या परिसरात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. हजारोंच्या संख्येनं जमलेला जनसमुदाय, त्यांचे पाणावलेले डोळे आणि अजितदादा अमर रहे, अजितदादा परत या.... अशा घोषणा... अशा अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. बंदुकीच्या फैरी झाडून त्यांना सलामी देण्यात आली.

तत्पूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुष्पचक्र अर्पण करून अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली. केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले, रक्षा खडसे आणि मुरलीधर मोहोळ यांच्यासह राज्याच्या मंत्रिमंडळातील मंत्री, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, यांच्यासह विविध पक्षांचे नेते, जेष्ठ नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह पवार कुटुंबातील सर्व सदस्य अजितदादांना अखेरचा निरोप देण्यासाठी उपस्थित होते. त्यांच्या निधनाबद्दल राज्य सरकारनं 3 दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे.

अजित पवार यांच्या निधनानं संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी काल पुणे, पिंपरी चिंचवड, आणि जालना शहरासह राज्यात अनेक ठिकाणी बंद पाळण्यात आला. अनेक दुकानं, व्यापारी आस्थापना काल बंद होत्या.

**<u>ब्लॅक बॉक्स</u>**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य चार जणांचं, ज्या विमान अपघातात निधन झालं, त्या लियरजेट 45 या दुर्घटनाग्रस्त विमानाचा ब्लॅकबॉक्स घटना स्थळावरून हस्तगत करण्यात आला आहे. या दुर्घटनेचा वेगानं तपास सुरू असल्याची माहिती नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं दिली आहे. या दुर्घटनेची सखोल, पारदर्शक चौकशी होईल आणि तपासाचं काम कालमर्यादेत पूर्ण केलं जाईल असं मंत्रालयानं समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<u>जिल्हा परिषद निवडणुका</u>**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला आहे, त्यामुळे राज्यातल्या 12 जिल्हा परिषदा आणि 125 पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये राज्य निवडणूक आयोगानं बदल केला आहे. त्यानुसार आता या निवडणुकीसाठीचं मतदान 5 फेब्रुवारी ऐवजी 7 फेब्रुवारीला होईल; तर मतमोजणी 9 फेब्रुवारी रोजी होईल. जाहीर प्रचाराची समाप्ती आता 5 फेब्रुवारी रोजी रात्री 10 वाजता होईल. संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना उद्या म्हणजे 31 जानेवारीला जारी करतील.

दरम्यान राज्यातल्या उमेदवारी अर्जाची छाननी आणि अर्ज माघारीच्या प्रक्रियेनंतर निवडणूक आयोगानं काल उमेदवारांची अंतिम यादी जाहीर केली. त्यानुसार 12 जिल्हा परिषदांच्या एकंदर 731 जागांसाठी 2 हजार 624 उमेदवार; तर 125 पंचायत समित्यांच्या 1 हजार 462 जागांसाठी 4 हजार 814 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

**आर्थिक सर्वेक्षण**

यंदाच्या वर्षात म्हणजे 2026 या वित्तीय वर्षात देशाचा सकल राष्ट्रीय उत्पादन अर्थात जीडीपी वाढीचा दर 7 पूर्णांक 4 दशांश टक्के राहण्याचा अंदाज आहे तर 2027 या वित्तीय वर्षात देशाचा विकास दर 6 पूर्णांक 8 ते 7 पूर्णांक दोन टक्क्यांदरम्यान राहण्याची शक्यता आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल संसदेत सादर केलेल्या आर्थिक सर्वेक्षणात हे अंदाज वर्तवण्यात आले आहेत. याबाबत अधिक माहिती माझ्या सहकारी मंजिरी गानू यांच्याकडून.....

**जागतिक अनिश्चितता आणि अमेरिकेच्या शुल्क धोरणानंतरही भारतीय अर्थव्यवस्था मजबूत कामगिरी करत असल्याचं या सर्वेक्षणात नमूद केलं आहे. देशांतर्गत उपभोगामुळे जीडीपी वाढीला मोठी चालना मिळत आहे. खासगी उपभोग आणि भांडवल निर्मितीचं वाढीला पाठबळ कायम असून पुरवठ्याच्या बाबतीत सेवांचं महत्त्वपूर्ण योगदान आहे. उत्पादन क्रियाकलापांचा जोर वाढला असून कृषी क्षेत्रानं स्थैर्य आणलं आहे, असं अहवालात म्हटलं आहे. नियतकालीन श्रमशक्ती सर्वेक्षण अर्थात पीएलएफएस सुरु करण्यात आल्यापासून देशातील रोजगाराची स्थिती सुधारली आहे, असं मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी काल नवी दिल्लीत पत्रकारांना 2025-26 च्या आर्थिक सर्वेक्षणाबद्दल माहिती देताना सांगितलं. देशाचा बेरोजगारी दर 2023-24 मधील सहा टक्क्यांवरून कमी होऊन 3 पूर्णांक 2 टक्क्यांवर आला आहे. तर श्रमशक्तीमध्ये महिलांच्या सहभागाचं प्रमाण जवळपास 18 टक्क्यांनी वाढलं आहे, अशी माहितीही नागेश्वरन यांनी यावेळी दिली. सध्याच्या जागतिक वातावरणात भारताची आर्थिक कामगिरी ओॲसिस ठरली आहे, असंही त्यांनी नमूद केलं.**

**अर्थसंकल्प**

2026-27 या आर्थिक वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प येत्या रविवारी सादर होणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन सलग नवव्यांदा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करतील. दरम्यान अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसद भवन परिसरात वार्ताहरांशी संवाद साधला. देशाची वाटचाल आता प्रलंबित समस्यांच्या पलिकडे जात दीर्घकालीन उपाययोजनांच्या मार्गावर होत असल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले.

**राज्य चित्ररथ सर्वोत्कृष्ट**

77 व्या प्रजासत्ताक दिनी दिल्लीतील कर्तव्यपथावर पार पडलेल्या दिमाखदार संचलनामध्ये सहभागी झालेल्या राज्यांच्या चित्ररथांमध्ये महाराष्ट्राच्या चित्ररथानं प्रथम क्रमांक पटकावला आहे. केंद्र सरकारच्या वतीनं काल या निकालांची घोषणा करण्यात आली. यंदा महाराष्ट्रानं 'गणेशोत्सव : आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सादर केला होता. या चित्ररथाच्या माध्यमातून राज्याची समृद्ध लोकसंस्कृती, गणेशोत्सवाचा सामाजिक वारसा आणि त्यातून मिळणारा आर्थिक रोजगार आणि आत्मनिर्भरतेचा संदेश अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आला होता. त्याचबरोबर पारंपरिक ढोल-ताशा पथक आणि लेझीम खेळणाऱ्या कलाकारांच्या उत्साहानं कर्तव्यपथावर जमलेल्या प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलं होतं. या गटात जम्मू-काश्मीरनं दुसरा आणि केरळ राज्यानं तिसरा क्रमांक पटकावला आहे.

**एनसीसी छात्र**

प्रजासत्ताक दिनाच्या संचलनानंतर राजधानी दिल्लीतील करिअप्पा मैदानावर पार पडलेल्या एनसीसी रॅलीमध्ये महाराष्ट्र संचालनालयाची ज्युनिअर अंडर ऑफिसर तनु भान हिला देशातील 'सर्वोत्कृष्ट कॅडेट' हा सर्वोच्च बहुमान मिळाला. बुधवारी झालेल्या दिमाखदार सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तनु भान हिला सुवर्ण पदक आणि मानाची 'केन' देऊन गौरविण्यात आलं. यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि एनसीसीचे महासंचालक लेफ्टनंट जनरल वीरेंद्र वत्स उपस्थित होते. देशभरातील 17 संचालनालयांमधील 20 लाख छात्रांच्या स्पर्धेत, तनु हिनं हा बहुमान पटकावला आहे.

दरम्यान यावर्षीच्या प्रजासत्ताक दिन सोहळ्याचा समारोप काल बीटिंग रिट्रीट या समारंभाने झाला. नवी दिल्लीत विजय चौकात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत हा दिमाखदार समारंभ पार पडला. सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांच्यासह तीनही सैन्य दलांचे प्रमुख या समारंभाला उपस्थित होते.

**<u>हुतात्मादिन</u>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज देशभरात त्यांना आदरांजली अर्पण करण्यात येत आहे. आजचा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. या दिनानिमित्त महात्मा गांधींना तसंच देशासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना आज सकाळी 11 वाजता दोन मिनिटं मौन पाळून आदरांजली वाहण्यात येणार आहे.

**<u>यूजीसी स्थगिती</u>**

सर्वोच्च न्यायालयानं विद्यापीठ अनुदान आयोगाच्या उच्च शिक्षण संस्थामध्ये समानतेस प्रोत्साहन देण्यासंबंधीच्या नव्या नियमावलीला काल स्थगिती देत तूर्त हे नियम लागू न करण्याचे आदेश दिले. हा स्थगिती आदेश देताना सर्वोच्च न्यायालयानं या नियमांबद्दल काही आक्षेप नोंदवले आहेत. सकृद्दर्शनी ही नियमावली सुस्पष्ट नाही आणि तिचा गैरवापर होण्याची शक्यता दिसत असल्याचं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं आहे. या नियमावलीचा ज्येष्ठ विधिज्ञांचा समावेश असलेल्या समितीद्वारे फेरविचार केला जावा, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठानं हा आदेश देताना सांगितलं.

**<u>पुणे-मनपा</u>**

पुणे महापालिकेची महापौर आणि उपमहापौरपदाची निवडणूक येत्या 9 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजता होणार आहे. या पदांसाठी 3 फेब्रुवारीला उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येतील. विशेष सभेत जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या अध्यक्षतेखाली ही निवडणूक होणार आहे. 165 सदस्य संख्या असलेल्या पुणे महापालिकेत सर्वाधिक 119 नगरसेवक भाजपचे आहेत.

**<u>निधन</u>**

ज्येष्ठ प्रकाशक अरविंद पाटकर यांचं काल पुण्यात अल्प आजारानं निधन झालं, ते 73 वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर काल वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. आशयघन, कल्पक पुस्तकांचे प्रकाशक अशी त्यांची ओळख होती. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली. मुंबईत कामगार चळवळीतही अनेक वर्ष त्यांनी सक्रीय भूमिका बजावली.

**<u>निधन-सुरतवाला</u>**

पुण्याचे माजी महापौर शांतीलाल सुरतवाला यांचं आज पहाटे पुण्यात अल्पशा आजारानं निधन झालं. ते 76 वर्षांचे होते. 1992 ते 93 या काळात त्यांनी पुण्याचं महापौरपद भूषवलं होतं. आपल्या महापौरपदाच्या कार्यकाळात त्यांनी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले.

**<u>हवामान</u>**

राज्यात सर्वत्र आज कोरडं हवामान राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.